भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/०७/२०१७

१) शेतीच्या वादावरुन रोवणा करण्यास विरोध केल्याने चाकुने वार करुन दोघांना जिवानीशि ठार केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २८/०७/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादी रजनी राजेन्द्र निंबार्ते वय ३५ वर्ष, रा. रेंगेपार याचा पती मृतक राजेन्द्र बाळकृष्ण निबार्ते वय ४५ वर्ष, हा त्याचे शेतामध्ये रोवणा करण्याकरीता ट्रॅक्टर सोबत घेवुन चालक सोबत येत असतांनी शेताजवळील नहराच्या पाळीवर यातील आरोपी याने शेतीच्या वादा वरुन फिर्यादीचा पती याचा रोवणा करण्यास विरोध करुन ट्रॅक्टर थांबवीले ट्रॅक्टर का थांबला म्हणुन फिर्यादीचा मोठा मृतक मुलगा राकेश राजेन्द्र निंबार्ते वय १५ वर्ष, हा धावत –धावत ट्रॅक्टरकडे गेला त्याच वेळी फिर्यादीचा पती मृतक यास आरोपीने चाकुने तोंडावर, मानेवर, छातीवर, हातावर वार करीत असतांना पाहुण वडीलास मदत करण्याकरीता मृतक राकेश हा धावुन गेला असता त्याचेवर सुध्दा आरोपीने छातीवर चाकुन वार करुन गंभिर जखमी केले फिर्यादीचा पती व मुलगा हे दोघेही जखमी अवस्थेत नहराच्या पाळीवर पडले त्याच वेळी फिर्यादी ही मजुरासह गेली असतांना त्यांना पाहुण आरोपी हा पळुन गेला फिर्यादीने पती व मुलाला गावाच्या लोकांच्या मदतीने ग्रामीण रुग्णालय लाखनी येथे भरती केले असता वैद्यकीय अधिकारी यांनी तपासनी करुन फिर्यादीचा पती व मुलगा यांना मृत घोषीत केल्याने फियादीचे पती व मुलगा यांना आरोपीने चाकुने वार करुन दोघांना जिवानिशी ठार केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेश लाखनी येथे कलम ३४१,३०२ भांदवि. अन्वये नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत लाखनी हे करीत आहेत.

२) क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन लोखंडी धारदार वस्तुने बोटारवर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २८/०७/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी क्रिष्णा पांडुरंग धरमशहारे वय ४४ वर्ष, रा. पोहरा हा आपले शेतावर जात असतांनी आरोपी हा आपले घरासमोर ऊभा असतांनी फिर्यादीने आरोपीला तु सहा दिवसापुर्वी भाष्कर गायधने रा. गडपेंढरी यास का मारले असे हटकले असता आरोपीने तु रस्त्यावर का विचारला असे बोलुन स्वत:चे घरुन लोखंडी धारदार शस्त्रासारखी वस्तु आणुन फिर्यादीचे उजवे बोटावर मारुन जखमी करुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२६,५०४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुलबांधे पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

३) ट्रक मधुन गॅस सिलेंडरची चोरी :–

दिनांक २७/०७/२०१७ चे १८.०० ते दिनांक २८/०७/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील आयुध निर्माण जवाहरनगर गोडावुन समोर ट्रक क्र. सीजी १५/ए ५७६२ हा रिकामा सिलेंडर ने भरलेला ट्रक उभा असतांना ४५० सिलेंडर किंमती २,०००/–रु. चे ट्रकमधुन कोणीतरी अज्ञात आरोपीने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी साहेबराव शामराव शेंडे वय ४७ वर्ष, रा. ४७ वर्ष, सावरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७९भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सार्वे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे सायकल चालकांस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०७/२०१२ चे १७.०० वा दर. यातील जखमी फिर्यादी विपीन रायभान तरजुले वय ३२ वर्ष, रा. सेंदुरवाफा हा आपले सायकलने सेंदुरवाफा टोली वरुन साकोली बाजारात एनएच ६ रोडाने जात असता साकोली कडुन सेंदुरवाफा टोली कडे जाणारा यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे सायकलला धडक दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पो.स्टे साकोली येथे कलम २७९,३३७ भादंवि.सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधी मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) ट्रॅक्टर रिवर्स घेते वेळी पलटी होवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक २३/०७/२०१२ चे १५.०० वा दर. यातील गुडरी ग्रा.पं. अतर्गत चिचगाव येथील मरघट कडे जाणाऱ्या पानदान रस्त्यात ट्रॅक्टरने मुरुम टाकण्याचे काम सुरु होते मजुरदारांच्या सहायाने मुरुम पसरवित असतांनी आपले ट्रॅक्टर मध्ये मुरुम आणुन ट्रॅक्टर रिवर्स घेत असतांनी ट्रॉली पलटी होवुन जखमी भोजराम तेजराम मेश्राम यांचे अंगावर पडुन त्याचे डोक्याला व डावे हाताला मार लागुन डावे हात फॅक्चर झाले यातील आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे तसेच मागे कोणीतरी आहे किंवा नाही याचे भान न ठेवुन रिवर्स घेते वेळी ट्रॅक्टर पलटी होवुन जखमी हयास फॅक्चर करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी संदेश तेजराम मेश्राम वय ३२ वर्ष, रा. चिचगाव यांचे लेखी रिपोर्ट व साना क्र. २३/१७ अपघात रजीस्टर क्र. १७/१७ दिनांक २७/०७/२०१७ चे अन्वयाचे पंचनाम्या वरुन पो.स्टे लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) अवैध दारु /जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २८/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा, साकोली, लाखांदुर व पवनी येथे अवैध दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून २५ लिटर हा.भ. दारू+ १ मग +१ ग्लास किंमती २२३०/–रु. ५ लिटर ४०० मिली लीटर देशी दारू कि. १५६०/रु तसेच जुगारातुन कि. ३५०/रु असा एकुण ४,१४०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

29.7.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.